## <u>नियमीत दिवाणी दावा क्र. २०६/२०२० मधील निशाणी ३२ खालील आदेश.</u>

वादी क्र. १ चे वारसांनी सदरचा अर्ज वादी क्र. १ चे बाबत झालेला अबेटमेंन्टचा आदेश रद्द होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वाण विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

३. सदरचा दावा हा दावा मिळकतीचे वाटप होण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा हा गुणागुणावर निकाल होणे गरजेचे व आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादी क्र. १ मयत झाल्यानंतर त्यांच्या पश्चात त्यांच्या वारसांना हा दावा चालविण्याचा अधिकार आहे असे मला वाटते. न्यायतत्वाच्या दृष्टीकोणातुन दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत वादी क्र. १ चे वारस यांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक वाटते. अबेटमेंटचा आदेश रद्द केल्यास व परिणामी वादी क्र. १ च्या वारसांना रेकॉर्डवर घेण्यास परवानगी दिल्यास वाद मुद्यांचे निराकरण गुणवत्तेवर होणार आहे. मात्र तसे न केल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल, परिणामी न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्याकरीता, अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. मात्र झालेल्या विलंबाबाबत वादी यांनी खर्चाची रक्कम देणे बाबत आदेश पारीत करणे न्यायोच्चीत वाटते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### <u>आदेश</u>

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. पुढील तारखेपर्यंत वादी यांनी रुपये २००/- (रु. दोनशे फक्त) खर्चाची रक्कम

सरकार जमा करावी.

३. वादी यांनी वरील पुर्तता केल्यानंतर अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2022.08.05 13:11:59 +0530

कोरेगाव.

दि. ०२/०८/२०२२

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.